
अपयश हे अल्प-यश, नसे शेवट जीवनाचा
वादळ-वाटांवरती, दिवा जळू दे आशेचा.
१०वी-१२वी व इतर नापासांसाठी
आशेचे किरण
भारुकाकाची पत्रे

माझ्या लाडक्या हुशार पोरांनो!

हो! तुम्ही जरी १०वी-१२वीत एकदा-दोनदा किंवा तीनदा नापास झाला असलात तरी तुम्ही सुद्धा तेवढेच हुशार आहात. फक्त या परीक्षांमध्ये तुम्ही पास होण्याची कामगिरी करू शकला नाहीत एवढेच! आणि आता निदान या प्रयत्नात तरी तुम्ही आत्मविश्वासाने अभ्यास केला व परीक्षा दिली तर तुम्ही नापास होण्याचा काही प्रश्नच उरत नाही! कारण इतर कोणत्याही कामात तुम्ही इतरांपेक्षा कमी नसणार, हो की नाही? मात्र त्यासाठी तुम्हाला पास होण्याची जिद्द बाळगावी लागेल, चिकाटीने प्रयत्न करावे लागतील आणि अथक परीश्रमही घ्यावे लागतील. एकदा तुम्ही पास झालात की मग पुढील शिक्षणाच्या बऱ्याच संधी तुमच्यासाठी खुल्या होतील आणि थोडया उशीराने का होईना तुम्ही तुमच्या उज्ज्वल भविष्याकडे वाटचाल करू लागाल.

पोरांनो! प्रत्येकामध्ये निसर्गाने अमर्याद क्षमता जन्मत:च दिलेल्या असतात यात वादच नाही. पास होण्यासाठी फक्त ३५गुणांची आवश्यकता असते. आपली क्षमता मात्र त्यापेक्षा कितीतरी पट जास्त असते. एखाद्या किंवा काही विषयात नापास झालेल्या विद्यार्थ्यालासुद्धा इतर विषयात चांगले गुण मिळालेले असतात. मग अजून थोडी जास्त मेहनत घेऊन नापास झालेल्या विषयात पास होणे अवघड असेल कदाचित पण अशक्य नसते.

कोणत्याही परीक्षेत, खेळात किंवा हाती घेतलेल्या कार्यात यशस्वी होण्यासाठी आधी आपल्यामध्ये ते करण्याविषयीचा आत्मविश्वास असणे नितांत गरजेचे असते. हाच नियम १०वी-१२वीच्या परीक्षांसाठीही लागु होतो. खरं म्हणजे या परीक्षांच्या जुन्या काही वर्षांच्या प्रश्नपत्रिकांचा अभ्यास केला तरी सुद्धा पास होण्याइतके गुण सहज मिळु शकतात. खरं म्हणजे नापास झालेल्या विषयांचा कमी-अधिक प्रमाणात अभ्यास तुम्ही एकदा केलेलाच असतो. त्यामुळे घाबरुन जायचे काही एक कारण नाही. मनापासून व शिस्तबद्धरित्या अभ्यासाचे नियोजन, आखणी केल्यास १०वी-१२वीच काय पण कोणतीही परीक्षा तुम्ही पास होऊ शकता. अगदी शंभर टक्के खात्रीपूर्वक असे होऊ शकते आणि ते कशाप्रकारे ते आपण पाहू या.

### सर्वात पहिली व महत्वाची पायरी म्हणजे गेलेला आत्मविश्वास परत मिळवणे.

१०वी-१२वी च्या परीक्षा खरं तर बऱ्यापैकी साचेबद्ध पद्धतीच्या असतात. प्रश्नपत्रिकांचे स्वरुपही ठराविक असे असते. त्यामुळे कोणीत्याही सर्वसाधारण विद्यार्थ्याला या परीक्षांमध्ये पास होणे सहज शक्य असते. अगदी इंग्रजी, विज्ञान किंवा गणितासारखा विषयही त्याला अपवाद नाही. त्यासाठी तसा स्वत:वरचा विश्वास मात्र आपण ठेवायला हवा. जी गोष्ट इतरांना शक्य आहे तीच गोष्ट आपल्यालाही शक्य आहे. त्यासाठी फार तर थोडी जास्त मेहनत करावी लागु शकते एवढाच काय तो फरक आहे. स्वत: अभ्यासाविषयी आवड निर्माण करुन व मित्रांकडून किंवा शिक्षकांकडून मदत घेऊन आपल्यातला विश्वास आपणच जागवायला हवा, नाही का?

### अभ्यासाचे नियोजन.

आपल्याला परीक्षांच्या तारखांविषयीची माहिती असतेच. त्यानुसार राहिलेल्या दिवसांचे अभ्यासाचे वेळापत्रक बनवून त्याप्रमाणे अभ्यास करावयास हवा. एकदा वेळापत्रक बनवल्यावर काय वाट्टेल ते झाले तरी वेळापत्रकानुसारचा अभ्यास पूर्ण करायचाच असा निर्धार करायला हवा. अभ्यास करताना अशी शिस्त बाळगणे अत्यंत गरजेचे असते आणि जे असे करतात ते नक्कीच यशस्वी होतात. विषयांचा अभ्यास वेळेत पूर्ण करुन पेपर्सच्या सरावासाठीही वेळ राखून ठेवायला हवा. समजा एखाद वेळी मनासारखा अभ्यास नाही झाला तरी नाराज, दु:खी किंवा नाऊमेद न होता पुन्हा नव्या जोमाने अभ्यासाला लागा. असा नेहमी नेहमी प्रयत्न केल्याने तुमचा मनासारखाही अभ्यास होऊ लागेल.

### पालकांचा सहभाग.

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करुन त्यांच्यात सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यात पालकांचा मोठा वाटा असतो. इतर सोयी-सुविधा पुरवण्याबरोबरच आपल्या पाल्याच्या मानसिक अडचणींकडे वेळच्यावेळी लक्ष देणे व त्यातून मार्ग काढण्यासाठी मदत करणे हि सर्वात महत्वाची भूमिका पालकांनी पार पाडावयास हवी. असे केल्यास पाल्यांचा विश्वास द्विगुणित होऊन ते कठिणातल्या कठिण परिस्थितीशीही यशस्वी मुकाबला करु शकतात.

अशाप्रकारे नियोजनबद्ध कृति केली तर १०वी-१२वीची परीक्षाच काय पण आयुष्यातील येणारी कोणतीही परीक्षा पास होऊ शकतो यात शंकाच नाही, त्यामुळे टेंशन न घेता ॲक्शन घ्या-अभ्यास करा आणि बिंधास्त परीक्षांना सामोरे जा.

आणि हो, तुमच्या सोबतीला भारूकाका व हि भारूकाकाची पत्रे आहेतच, नाही का? एवढे सर्व करुनही काही शंका, प्रश्न किंवा अडचणी असल्या तर खालील पैकी कोणत्याही मार्गाने जरूर कळवा.

बेस्ट ऑफ लक! खूप-खूप शुभेच्छा!

तुमचा लाडका,

भारूकाका

Mobile No. 086523 40256 E mail: info@bharukaka.com